# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**
**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५**

## पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - १२

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: यू-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४३५, परिस्थितिकी व पर्यावरण**<br>**रूपये:- ४,४९,९५,०४,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१) | ५५१ | १०० | पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरातील सांडपाणी हे शुद्धीकरण न करता थेट मुळा-मुठा, इंद्रायणी व इतर नद्यांमध्ये सोडल्यामुळे या दोन्ही नद्यांचे पाणी अतिशय प्रदूषित होणे, यामुळे नदी किनारच्या गावातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, सदर गावातील नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत ही खराब होणे, शेती नापीक झालेली असणे, शहरातील नदी किनारच्या भागांमध्ये मच्छरांचा प्रादुर्भाव वाढवून रोगराई वाढणे, त्यामुळे नागरिकांना विविध जातीच्या आजारांना सामोरे जावे लागणे, यामुळे मुळा मुठा इंद्रायणी नदी व इतर नद्यांमध्ये सोडण्यात येणारे सांडपाणी थेट न सोडता त्यावर प्रक्रिया करून सोडणे आवश्यक, तसेच सदर मैला पाणी शुद्धीकरण करण्यासाठी उभारण्यात आलेले प्रकल्प केवळ दिवसा सुरू न ठेवता दोन्ही शिफ्ट मध्ये सुरू ठेवून पाणी शुद्धीकरण करणे आवश्यक, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२) | ३६४ | १० | वर्धा नदी चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमेजवळ घुग्घुस (चंद्रपूर जिल्ह्यात) येथे स्थित असून २०२३, २०२४ आणि २०२५ साठी वर्धा नदीमध्ये कोळसा वाहतुकीसाठी मोठ्या वाहनांसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडला मातीचा पूल बांधण्याची परवानगी जलसंपदा विभागाने देणे, सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घेणे बंधनकारक असूनही, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने ती घेतली नसणे, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने जलसंपदा विभागाच्या अटी आणि शर्तींनुसार पुलाचा दर्जा सुनिश्चित केला नसल्यामुळे मातीचा पूल पाण्यामुळे वाहून जाणे आणि त्यासोबत पाइप्स, दगड, सिमेंट काँक्रीट वगैरे वाहून जाऊन नदी प्रदूषित होणे, घुग्घुस आणि नागपूर येथील नागरिकांनी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाहीसाठी जलसंपदा विभागाकडे तक्रारी केल्या असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तसेच वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने चंद्रपूर जिल्ह्यातील इराई आणि जरपट नद्यांच्या प्रदूषणास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करणे, यामध्ये नियम व अटींचे सर्रास उल्लंघन झाल्याचे उघड होऊनही कोणतीच कारवाई होत नसल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३) | ३७२ | १० | मुंबई उपनगर जिल्ह्यात सी.टी.एस.३५२५ मालवणी गांव, तालुका - बोरिवली, कलाविद्यालय कॉलेज जवळ, म्हाडा लेआऊट, मालाड (पश्चिम), मुंबई येथील सार्वजनिक आरोग्य केंद्र व प्रसूती गृहासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर अनधिकृत रेडी मिक्स कॉंक्रीट प्लांट टाकण्यात आला असणे, रेडी मिक्स कॉंक्रिट प्लांट मुळ स्थानिक रहिवाशांना श्वसनाचे आजार झाले असणे, त्याचप्रमाणे दमा ब्रॉकायंटिस, ह्दय रक्तवाहिन्या संबंधिचे भयंकर रोग निर्माण झाले असणे, प्रदूषण निर्माण झाले असणे, प्रदूषण कायद्याचे उल्लंघन होत असणे, या सर्व बाबीला महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी खतपाणी घालत असणे, रेडी मिक्स कॉंक्रीट प्लांट वर व संबंधित महानगरपालिकेचे अधिका-यांची कठोर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, स्थानिक रहिवाशांनी महापालिका आयुक्त, सहाय्यक आयुक्त, पी/उत्तर विभाग, मनपा, मा. मुख्यमंत्री, प्रदूषण मंडळ, मुंबई यांच्याकडे तक्रारी केल्या असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ३७३ | १० | मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथे महानगरपालिकेचे मलनि:स्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र असून मे मॉट मॅकडोनाल्ड कन्सेर्शियम या सल्लागार कंपनीने अभ्यास करुन बृहन्मुंबई मलनि:स्सारण प्रकल्प टप्पा-२ चा मास्टर प्लॅन तयार करुन ४५४ द.ल.प्रतिदिन क्षमतेची अद्यावत द्वितीय/तृतीय स्तरीय प्रक्रिया केंद्र उभारण्याकरीता मलजल प्रक्रिया केंद्र प्रस्तावित केले असणे, केंद्र व राज्य शासनाच्या सर्व विभागाच्या परवानग्या मिळाल्या असणे, तथापि, महानगरपालिकेने मल:निस्सारण सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प टप्पा-२ चे कामाला गती नसणे, दररोज ४०० द.ल. पेक्षा जास्त अप्रक्रिया केलेले सांडपाणी समुद्रात सोडत असणे, प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे समुद्रात जाणारे सांडपाणी पर्यावरणाला हानी पोहोचवत असणे, समुद्राचे पाणी अधिक प्रदूषित होत असणे तसेच मासे मरत असणे, समुद्रातील जीवसृष्टी धोक्यात असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५) | ३८६ | १० | कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पंचगंगा व वारणा नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण निर्माण होत असणे, परिसरातील औद्योगिक वसाहतीतील रसायन मिश्रित सांडपाणी तसेच वस्त्रोद्योग व्यवसायासाठी निगडित प्रोसेसिंग युनिट चे पाणी व त्या पाण्यावर प्रक्रिया न करता नदीत सोडले जात असणे, मे वारणा रहिवासी साखर कारखान्यावर जल प्रदूषण मंडळाने कोणतीही कार्यवाही केली नसणे, सदरच्या कारखान्यांमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असणे, जनजीवन प्राणी मृत होत असणे, प्राण्यांना पिण्याचे पाणी पिणे आयोग्य असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ३८७ | १० | ठाणे व रायगड जिल्ह्यातील एम.आय.डी.सी.तील अनेक कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्यामुळे नद्यांच्या प्रदूषणात वाढ झाली असणे, तळोजा औद्योगिक वसाहती मधील औद्योगिक दूषित सांडपाणी जीन्स वॉश उद्योगाच्या पाण्यामुळे प्रदूषण निर्माण होत असणे, प्रदूषणामुळे मच्छीमारांच्या समस्या वाढत असणे, सागरी किनारी पट्टीवरील प्रदुषणामुळे मत्स्योत्पादनावर मोठा दुष्परिणाम होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ४२६ | १० | पुणे जिल्ह्यातील नद्यांमध्ये सांडपाणी व रसायन मिश्रित पाणी सोडल्याने प्रदूषण वाढलेले असणे, मुळा मुठा पवना इंद्रायणी व भीमा या नद्यांमध्ये कंपन्यांद्वारे सांडपाणी सोडले जात असणे, राजीव गांधी आयटी पार्क मधील सांडपाणी सोडले जात असणे, त्यामुळे जलपर्णी नष्ट करण्यासाठी श्री शेखर यांचे तंत्रज्ञान वापरण्याचे आदेश दिले असणे, मात्र त्याची अंमलबजावणी झाली नसणे, त्यामुळे प्रदूषणात वाढ असणे, प्रदूषणाचा प्राण्यांवर व जनजीवनावर दुष्परिणाम होत असणे, प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची गरज असणे, संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ४२७ | १० | मौजे वडवली तालुका वाडा, जिल्हा पालघर या ग्रामपंचायत हद्दीतील टायर कंपन्या व टायर बनविणाऱ्या कंपन्यांमुळे प्रदूषण निर्माण होत असणे, त्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येत असणे, ग्रामस्थांना वेगवेगळया प्रकारचे रोग होत असणे, जलचर प्राणी मृत होत असणे, शेती नापीक होत असणे, कंपन्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे स्थानिकांना श्वसनाचे आजार होत असणे, त्यामुळे नागरिक व जलचर प्राण्यांचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीच्या उपाययोजना. |
| (९) | ४२८ | १० | मुंबई शहर व उपनगरामध्ये वाहनांची संख्या वाढत असणे, मुंबईतील ४ प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहन पोर्टलवरील नोंद असणाऱ्या वाहनांची संख्या ३८,५३,०७० इतकी असणे, वाहनांमुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाची हानी होत असणे, वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम होत असणे, नागरिकांना श्वसनाचा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्रास होत असणे, फुफ्फुस खराब होत असणे, मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) पेट्रोल आणि डिझेल वाहनांवर बंदी घालण्याची शक्यता तपासण्यासाठी शासनाने सात सदस्यांची समिती स्थापन केली असणे, निवृत्त आयएएस अधिकारी सुधीर कुमार श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखालील या समितीमध्ये महाराष्ट्राचे वाहतूक आयुक्त, मुंबईचे सह पोलिस आयुक्त (वाहतूक) आणि उद्योग तज्ञ यांसारखे प्रमुख भागधारक समाविष्ट असणे, समितीना अशा बंदीची व्यवहार्यता अभ्यासण्याचे काम देण्यात आले असणे व समितीनी तीन महिन्यांत त्यांचा अहवाल शासनाला सादर करणे आवश्यता असणे, परंतु समितीने त्यांचा अहवाल शासनाला सादर केलेला नसणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ४२९ | १० | पालघर शहराजवळील बोईसर हे सर्वात मोठे औद्योगिक उपनगर असणे, १५०० हून अधिक औद्योगिक युनिट्सचे अस्तित्व असणे, बोईसर औद्योगिक कारखान्यांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया न करता नदी नाल्यात सोडल्यामुळे जल प्रदूषण निर्माण होत असणे, स्थानिकांना वेगवेगळया प्रकारचे रोग होत असणे, जलचर प्राणी मृत होत असणे, शेती नापीक होत असणे, औद्योगिक युनिट मधून निघणाऱ्या धुरामुळे स्थानिकांन श्वसनाचे आजार होत असणे, त्यामुळे नागरिक व जलचर प्राण्यांचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीच्या उपाययोजना. |
| (११) | ५३५ | १० | चंद्रपूर जिल्हयातील एम.आय.डी.सी परिसरात सिमेंट कंपन्या व विविध कंपन्यामूळे वायु व जल प्रदूषणात वाढ होत असणे, दिवसेंदिवस वायू व जल प्रदूषणात वाढ झाली असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असणे, उद्योगाच्या प्रदूषणामुळे शेतक-यांच्या जमिनी व पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असणे, अल्ट्राटेक व माणिकगड (ता. कोरपना, जि.चंद्रपूर ) या सिमेंट कंपन्यामूळे मौ. गडचांदूर, बैलमपूर, मानोली व गोपालपूर या भागात मोठया प्रमाणावर प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले असणे, प्रदूषण नियंत्रण करणा-या मशिन कार्यरत नसणे, धुळ उडत असणे, सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता नदी नाल्यामध्ये सोडले जात असणे, त्यामुळे स्थानिक रहिवाशांना आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, फुफ्फुसाचे आजार व ब्राँकांटिस सारखे आजार होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५३८ | १० | शाळगांव बोंबाळे, जि.सांगली येथील महाराष्ट्र औद्योगिक विकासमंडळ क्षेत्रातील केमिकल्स व खत कंपन्याकडून केमिकल युक्त पाणी बोअरमध्ये पाणी सोडणे, त्याप्रमाणे मॅनमार या कंपनीतून दिनांक २१ नोव्हेंबर,२०२४ रोजी अमोनिया वायूची गळती झाल्यामुळे ३ नागरीकांचे प्राण गेले असणे, दोन्ही कंपन्याच्या प्रदूषणामुळे अनेक नागरीक संसर्ग झाल्याने त्यांना श्वसनाचा त्रास झाल्याचे दिसून येणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नागरीकांची स्थिती चिंताजनक असणे, झाडे व पिके पूर्णपणे जळाली असणे, प्रदूषण थांबवण्यासाठी आवश्यकता निर्माण झाली असणे, तशी मागणी स्थानिक रहिवाशांना जिल्हाधिकारी, संगली यांच्याकडे केली असणे, यबाबात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १८ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई